नि.दि.दा.क्र.१८१/२०१८
नि.क्र.९२

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.२, ३अ आणि ४ ते ६ करीता विधीज्ञ श्री.एन.जी. खंडागळे यांच्या वतीने शपथेवर सुरु-</u>

२. मारोती हे माझे वडील होते. हे म्हणणे खरे आहे की, शेवंताबाई ही मारोतीची पहिली पत्नी होती. साक्षीदार स्वतः सांगते की, शेवंताबाई ही त्यांची आई होती.

**<u>प्रश्न</u>** - शेवंताबाईची बहीण “पवार” कुटूंबात दिली होती ?

**<u>उत्तर</u>** - शेवंताबाईच्या बहिणीला कोणत्या कुटूंबात दिले होते, त्यांचे आडनाव मला माहित नाही.

हे म्हणणे खरे आहे की, शेवंताबाईच्या त्या बहिणीला मुलबाळ नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, शेवंताबाईच्या बहिणीला मुलबाळ नसल्याने तिने प्रतिवादी क्र.६ भिकूबाईला दत्तक घेतले होते. भिकूबाईचे शाळेतील नाव भिकू नारायण पवार असे होते, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या आईचे नाव कुसूमबाई असे होते. शेवंताबाईचा मृत्यू सन १९५८ मध्ये झाल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, शेवंताबाईच्या मृत्यूनंतर मारोतीने सन १९६१ मध्ये कुसूमबाईशी लग्न केले. हे म्हणणे खरे नाही की, कुसूमबाई ही आमची जन्मदाती आई आहे.

३. मारोती यांना शेवंताबाईपासून बाळा आणि भिकूबाई अशी दोन अपत्ये झाल्याचे मला माहित नाही. मारोती यांना कुसूमबाई पासून मी, वादी क्र.१ ते ५, मयत प्रतिवादी क्र.१ एकनाथ, मयत संगीता इतके अपत्ये झाल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमीन-१अ ही जमीन शेवंताबाईने विकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र.१८१० अन्वये दावा जमीन-१अ या जमिनीवर शेवंताबाईच्या नावाची नोंद झाली. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमीन-१अ ही शेवंताबाईची स्वतंत्र मिळकत असल्याने सदर मिळकतीमध्ये आमचा हिस्सा नाही आणि आम्हांला हिस्सा मागण्याचा अधिकार नाही.

४. आम्ही दावा जमीन-१क या जमिनीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमीन-१क ही मारोतीने सन १९५९ मध्ये शर्त खरेदीने दुस-या व्यक्तीला दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमीन-१क ही मारोतीने सन १९५९ मध्ये शर्त खरेदीने दुस-या व्यक्तीला दिल्यामुळे सदर जमिनीशी आमचा कसलाही संबंध नाही.

**<u>प्रश्न</u>** - तथाकथीत मृत्यूपत्र लिहून देतेवेळेस मयत प्रतिवादी क्र.१ एकनाथ हा कुठे राहायचा ?

**<u>उत्तर</u>** - आई-वडीलांच्या मृत्यूनंतर एकनाथ हा सर्व बहिणींकडे येवून-जावून राहत होता आणि तो माझ्या घरी वारला.

५. मी दाव्यात नमूद पत्त्यावर राहते. माझ्या म्हणण्याप्रमाणे एकनाथ याने

दि.२४/०६/२०२२ रोजी मृत्यूपत्र लिहून दिले. त्यावेळेस एकनाथ हा शारिरिक व मानसिकदृष्टया सक्षम होता. एकनाथ हा घाबरटमुळे वारला. हे म्हणणे खरे आहे की, एकनाथ हा दि.२६/०६/२०२२ रोजी वारला. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामुळे दि.२४/०६/२०२२ रोजी एकनाथ हा अंथरुणावर खिळून होता. हे म्हणणे खरे नाही की, एकनाथ याने कधीही माझ्या हक्कात मृत्यूपत्र लिहून दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमीन बळकाविण्याच्या उद्देशाने एकनाथच्या अपरोक्ष मी त्याच्या नावाचे खोटे व बनावट मृत्यूपत्र करुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमीन-१अ व १-क या जमिनीशी आमचा संबंध नसल्यामुळे त्या जमिनीत वाटप मागण्याचा आम्हाला कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही खोटा दावा दाखल केला व मी पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

ASHISH BIHARILAL MARLECHA
Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2026.02.09 17:06:07 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक ०९/०२/२०२६

**Order below Exh.92 in RCS No.181/2018**

Defendant No.7 and his advocate remained absent when repeatedly called till 12.30 pm. Defendant No.7 failed to conduct cross examination. No adjournment has been sought. Hence, suit to proceed without cross examination of this witness by defendant No.7.

ASHISH BIHARILAL MARLECHA
Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2026.02.09 17:06:12 +0530

(Ashish B. Marlecha)
Civil Judge Senior Division,
Shrirampur, Dist. A.Nagar.

Date : 09/02/2026